औरंगजेबाने सुलतानपदी बसून 1966 पर्यंत पिता शहाजहानला कैदेत टाकले. शहाजहानची कारकीर्द म्हणजे मोंघल कला आणि शिल्पकलेचा सुवर्णकाळ मानला जातो.

ताजमहल

ताजमहाल : मोंघल सम्राट शहाजहानने त्याची पत्नी मुमताज महलच्या स्मरणार्थ उत्तर प्रदेशातील यमुना नदीच्या तीरावर आग्रा येथे ताजमहाल बांधला. याचे बांधकाम 1632 ला सुरु होऊन 1653 च्या दरम्यान पूर्ण झाले. हे बांधकाम पांढऱ्या शुभ्र संगमरवरी दगडाचे आहे. हे जगातील सात आश्चर्यापैकी एक आहे. युनेस्कोने जाहीर केलेल्या जागतिक वारसास्थळापैकी ताजमहाल एक आहे.

औरंगजेब

बालपणीच सैनिकी प्रशिक्षण घेतल्यामुळे तो समर्थ योध्दा बनला. वडील शहाजहान यांना बंदी बनवून 'आलमगीर' हे नाव धारण करुन स्वत: सिंहासनावर बसला. तो कट्टर सुन्नी पंथीय होता. त्यांने राज्यात कुराणातील कायदे जारी केले. या कायद्यांची आणि कुराणातील शिकवणीची अमलबजावणी होते की नाही हे पाहण्यासाठी 'मुक्तसिब' यांची नेमणूक प्रत्येक शहरात केली. राज्यात सतीपध्दत, मद्यपान, गांजाची लागवड यावर बंदी घातली.

औरंगजेबाच्या जुलमी सत्तेच्या विरोधात उत्तर भारतात जाट, सतनामी आणि शिखांनी बंड केले. 9 वे शिख तेजबहादूर यांची औरंगजेबाने निर्घृण हत्या केली. त्या काळातील भारतातील प्रबळ राजपूतांच्या विरोधाला त्याला तोंड द्यावे लागले. ते त्याच्या साम्राज्याच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरले. दक्षिणेकडे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक शिवाजी महाराजांनी औरंगजेबाला जेरिस आणले त्याला सतत मराठ्यांशी संघर्ष करावा लागला. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी राजाना त्याने कपटाने आणि अत्यंत क्रूरपणे ठार मारले. दक्षिणेकडील विजापूरचा आदिलशहा आणि गोवळकोंड्याचा निझामशहा यांना पराभूत करुन तो भाग मोंघल साम्राज्याला जोडला.

मोंघलांचे योगदान

राज्यकारभार : मोंघलाचे उत्तराधिकारत्व वारसा हक्काने प्राप्त होत असे. बादशहा सर्वसत्ताधीश असे. राज्यकारभारात सहाय्य करण्यासाठी मंत्रीमंडळ अस्तित्वात होते. पर्शियन भाषेचा वापर कार्यालयीन भाषा म्हणून केला जात असे. राज्यकारभाराच्या सोयीसाठी साम्राजाचे प्रांत, जिल्हा, परगणा आणि नगर असे भाग पाडले होते. यावर देखरेख करण्यासाठी आधिकाऱ्यांची नेमणूक केली होती. सुलतान हा न्यायदानातील सर्वश्रेष्ठ न्यायाधीश असे.मोंघल राजकर्त्यांना सेनापती किंवा

©KTBS Not to be republished

शिवाजी महाराजांचा जन्म पुणे जिल्हयातील शिवनेरी येथे 20 एप्रिल 1627 मध्ये शहाजीराजे भोसले व जिजाबाई यांच्या पोटी झाला.जिजाबाई या धार्मिक, श्रध्दाळू, नितीवान आणि खूप सात्विक होत्या. त्यांनी आपल्या पुत्राला नैतिक मूल्यांचे धडे देउन स्वराज्याच्या स्थापनेस प्रवृत केले. दादोजी कोंडदेव हे शिवाजी महाराजांचे गुरु होते. त्यांनी राजांना शास्त्र आणि शस्त्रास्त्रात पारंगत केले. त्यांनी राजांना शारिरिक व्यायाम, तलवारबाजी, घोडेस्वारी ही क्षत्रिय कौशल्ये बालवयातच शिकविली. राजांनी बालपणापासूनच स्वराज्यनिर्मितीचा ध्यास घेतला होता. पुणे हे आपले केंद्र करुन राज्यविस्तारास सुरुवात केली. सह्याद्रिच्या दऱ्याखोऱ्यातील तरुण मावळ्यांना गोळा करुन त्यांना गनिमी काव्यात तरबेज केले. या काळात त्यांनी विजापूरचा सुलतान, दिल्लीचे मोंगल आणि कर्नाटकात मोहिमा आखल्या. त्यांनी तोरणा गड, पुरंदरचा किल्ला, चाकण, जावळीचा किल्ला, सिंहगड ताब्यात घेतला. त्यांनी राजगड, प्रतापगड हे किल्ले बांधले. शिवाजी राजांनी जेंव्हा विजापूरच्या सुलतानाविरोधात मोहिमा आखल्या तेव्हा सुलतानाने शहाजी राजांना कैदेत टाकले, त्यामुळे राजांनी सुलतानांशी तह केला आणि शहाजी राजांना सोडवले. पुढे विजापूरच्या सुलतानांने राजांचा बंदोबस्त करण्यासाठी अफजल खानाला पाठविले. कपटाने राजांना मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या अफजल खानला स्वत:चा जीव गमवावा लागला.



©KTBS Not to be republished

मीराबाई : मेवाडची राजकन्या मीरा ही देखील भक्तीपंथाच्या चळवळीशी संबधित आहे. तिने लौकीक जीवनाचा त्याग केला आणि कृष्णभक्तीत रममाण झाली. ती कृष्णालाच आपला पती मानत असे. तिने रचलेल्या कृष्णावरील किर्तनात कृष्णलिलांचे वर्णन आढळते. आजदेखील उत्तर भारतासह संपूर्ण भारतात मीराबाईंची कृष्णप्रेमाने ओथंबलेली भजने भक्तीभावाने गाईली जातात.


मीराबाई

भारताच्या इतर भागात देखील संतसंप्रदायाच्या लोकांनी हिंदू मुसलमान धर्मात एकात्मता /सेतू साधण्याचे कार्य केले. महाराष्ट्रात भीमा नदीच्या काठावर पंढरपूर येथे वारकरी संप्रदायाला सुरुवात झाली. या संतानी भक्तीच्या परिभाषा बदलल्या, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास हे संत त्यापैकी प्रमुख होते. कर्नाटकात कनकदास आणि पुरंदरदास हे धार्मिक चळवळीच्या अग्रस्थानी होते. पुरंदरदासानी आणि कनकदासानी 'मोहनतरंगीणी ' या कन्नड महाकाव्याची रचना केली.

काही सूफी संत

ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ति, बाबा फरिद, निजामुद्दीन अवलिया, मलिक मोहम्मद, ख्वाजा बंदे नवाज.

सूफी पंथ : पर्शियामधून आलेले सूफी संत भारताच्या अनेक भागात स्थायीक झाले. त्यांना 'पीर' असे म्हटले जाते. ते 'सूफ' म्हणजे साध्या लोकरीच्या कपड्यापासून बनलेले वस्त्र धारण करीत असत, म्हणून त्यांना सूफी म्हटले जाई. त्यांनी प्रेम आणि भक्तीची शिकवण दिली. या गुणांनी आपण देवाजवळ (अल्लाहा) पोहचू शकतो असा त्यांचा विश्वास होता. त्यांनी समाजातील सर्वच घटकांना सारखाच मान मिळाला पाहिजे यावर भर दिला. भक्तीरसाने ओथंबलेले संगीत, नृत्य देवाच्या जवळ घेउन जाते असा त्यांचा विश्वास होता. सूफी संतानी उर्दू आणि हिंदी भाषेत अनेक भजनांची रचना केली. सूफीमध्ये 12 पंथ आहेत. त्यांनी सुरु केलेल्या उरुस या समारंभात हिंदू-मुस्लीम श्रद्धेने सहभागी होतात. हे आपल्याला आजही पहावयास मिळते.

कुतुबनने रचलेल्या 'मृगावती' आणि मलिक मोहम्मद जैसीने लिहिलेल्या 'पद्मावती' या रचनात सूफी तत्वज्ञानातील कल्पना आढळून येतात.

शिशुनाळ शरीफ (1819-1889)

इमाम व हजूमा हे त्यांचे आई वडील होत. आजच्या हावेरी जिल्हयातील शिग्गावी तालुक्यात 1819 मध्ये त्यांचा जन्म झाला. काझीच्या सहय्यानुसार त्यांच्या वडिलांनी इमाम साहेबांनी आपल्या मुलाचे नाव मोहम्मद शरीफ असे ठेवले.

©KTBS Not to be republished

फ्रान्सची राज्यक्रांती

फ्रेंच राज्यक्रांतीचा उद्देश म्हणजे तेथील निरंकुश राजसत्ता उलथून टाकणे आणि समानता व लोकशाहीवर आधारलेली नवीन सामाजिक व राजकीय व्यवस्था प्रस्थापित करणे. या क्रांतीचा जगातील इतर देशातील राजकीय चळवळीवर खोलवर प्रभाव पडला.

कारणे : फ्रान्सच्या राज्यक्रांतीला खालील घटक कारणीभूत ठरले.

तुम्हाला माहित असू दे

इतिहासकारांच्या मतानुसार फ्रान्सची क्रांती झाल्यावर युरोपचा इतिहास एक राष्ट्र, एक घटना आणि एका व्यक्तीमध्ये एकवटला गेला. ते राष्ट्र म्हणजे फ्रान्स, ती घटना म्हणजे फ्रेंच क्रांती आणि ती व्यक्ती म्हणजे नेपोलियन.

सामाजिक कारणे : फ्रेंच समाजात फार मोठ्या प्रमाणात विषमता होती. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात ही असमानता होती. ही असहनीय व अमानवीय गोष्ट होती. बुध्दिवंतांनी व सामान्य लोकांनी याचा तिरस्कार केला. क्रांतीच्या पूर्वी फ्रान्सच्या समाजात तीन वर्ग होते त्यांना इस्टेट म्हणत. पहिल्या वर्गात धर्मगुरु, दुसऱ्या वर्गात अमीर उमराव आणि उरलेल्या सर्वसामान्य लोकांचा समावेश तिसऱ्या वर्गात केलेला होता.

पहिल्या दोन वर्गांना विशेषाधिकार होते आणि ते संख्येने अत्यंत कमी होते. सर्व प्रकारच्या कर भरण्यापासून ते मुक्त होते. शिवाय ते ऐष आरामी जीवन जगत होते.

तिसऱ्या वर्गातील लोक सर्व सोयींपासून वंचित होते. यामध्ये गरीब शेतकरी, मध्यम वर्गीय लोक, कारागीर, कामगार यांचा समावेश होता. त्यांचे उत्पन्न अत्यंत कमी होते. त्यांच्यावर करांचा बोजा अधिक होता. त्यांचे जीवन दु:खपूर्ण होते. या सर्व लोकांना समाजात मानाचे स्थान नव्हते. त्यांना राजकीय हक्क नव्हते आणि त्यांना अपमानास्पद वागणूक दिली जात असे. त्यांना धार्मिक किंवा राजकीय कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य नव्हते. फ्रान्समधील जनतेत हेच लोक अत्यंत असमाधानी होते. ते लोक जुनी व्यवस्था उलथून टाकण्यासाठी संधीची वाटच पहात होते.

आर्थिक कारणे : फ्रान्स हा मूलत: कृषिप्रधान देश होता. जरी शेती पध्दतीमध्ये काही सुधारणा झालेल्या असल्या तरी शेती अजूनही मागासलेली होती. जमिनीपासून मिळणारे उत्पन्न फार कमी होते. शेतकऱ्यांनाच जास्त कष्ट भोगावे लागत होते. दुष्काळ पडणे ही गोष्ट सर्वसामान्य होती. त्यामुळे अन्नासाठी उठाव होत. उद्योगधंद्यावर व्यापारीसंघाचे नियंत्रण होते. अंतर्गत अडथळ्यांमुळे आणि अधिकाऱ्यांच्या अतिहस्तक्षेपामुळे त्यांची वाढ खुंटली होती. याचा परिणाम म्हणजे उद्योगात उत्पादन कमी होऊ लागले.

राजकीय कारणे : फ्रान्सवर बुर्बान घराण्याची सत्ता होती. 16 वा लुई हा राजा बुध्दिमान परंतु अकार्यक्षम होता. तो व्हर्सेलिस येथील आलिशान राजवाड्यात आपला कुटुंबकबिला व राजदरबारी व्यक्तींसह रहात होता. तो सुखी व विलासी जीवन जगत असे. शिवाय तो उधळ्या स्वभावाचा होता पण सरकारी कामकाजाकडे तो दुर्लक्ष करीत होता. त्याची पत्नी मेरी अन्तोनेत ही ऑस्ट्रियन राजकन्या

©KTBS Not to be republished

1) नागरी न्यायालये (Civil Courts)

2) दंडन्यायालये (Criminal Court)

नागरी न्यायालये : प्रत्येक जिल्ह्यात नागरी न्यायालय असते आणि जिल्हान्यायाधीश हा त्याचा प्रमुख असतो. उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या सल्यानुसार राष्ट्रपती सरन्यायाधीशांची नियुक्ती करतात. राज्याच्या कोणत्याही न्यायालयात किमान 7 वर्षे वकील म्हणून काम केलेली व्यक्ती सरन्यायाधीश होवू शकते. इतर न्यायाधीशांची नियुक्ती स्पर्धापरीक्षांव्दारे केली जाते.

नागरी न्यायालयात मालमत्ता व जमीन, आर्थिक व्यवहार, विवाह, घटस्फोट आणि इतर खटल्यांचा विचार करुन निर्णय दिला जातो. कनिष्ठ न्यायालयाकडून आलेले अपील स्विकारतात. जिल्हा न्यायाधीश जिल्ह्यातील सर्व नागरी व्यवहारांवर नियंत्रण ठेवतात.

इतर कांही न्यायालये जिल्हा न्यायालयाच्या आधीन असतात–

1) खालच्या दर्जाच्या न्यायाधीशांचे न्यायालय (Court of subordinate judges)

2) अतिरिक्त खालच्या दर्जाच्या न्यायाधीशांचे न्यायालय (Court of additional subordinate judges)

3) मुन्सीफस् न्यायालय (Court of Munsiffs) :

4) अतिरिक्त मुन्सीफस् न्यायालय (Court of additional Munsiffs)

दंडन्यायालय (Criminal court) : 1 एप्रिल 1974 रोजी दंडन्यायालय अस्तित्वात आले. त्यांना जिल्हा दंडाधिकार न्यायालय असेही म्हणतात. ते उच्च न्यायालयाच्या अधिकाराखाली काम करते. जिल्हास्तरावर सर्वोच्च न्यायालय म्हणजेच सत्रन्यायालय असते. जिल्हान्यायाधीश हाच या सत्र न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून काम पहातो. खून, दरोडा, मारामारी, चोरी इ. गुन्ह्यांबाबतीत हे न्यायालय निर्णय देते. त्यांना मृत्यूदंडाची तसेच जन्मठेपेची शिक्षा देण्याचा अधिकार असतो. परंतु अशा निर्णयांना उच्च न्यायालयाची मंजूरी असावी लागते. त्याचप्रमाणे दंडन्यायालयाने दिलेल्या निकालावर उच्च न्यायालयात अपील करता येवू शकते.

दंडन्यायालयाच्या अधिकाराखाली इतर दंडन्यायालयेही काम करतात –

मुख्य दंडाधिकारी न्यायालय (Cheif magisterial court) : या न्यायालयाला मृत्यूदंड किंवा जन्मठेपेचा निर्णय देण्याचा अधिकार नसतो परंतू 7 वर्षाच्या कारावासाची शिक्षा देण्याचा अधिकार असतो.

प्रथमश्रेणी दंडाधिकारी न्यायालय (First grade magisterial court) : या न्यायालयाला जास्त अधिकार आहेत. 3 वर्षाचा कारावास किंवा रु. 5000 दंड किंवा दोन्हीही शिक्षा देवू शकते.

©KTBS Not to be republished

प्रकरण 6
खनिज संपत्ती

या पाठाच्या अभ्यासाने तुम्ही खालील गोष्टी जाणून घ्याल

- कर्नाटकात उपलब्ध असलेली खनिजे आणि त्यांचे महत्व
- कर्नाटकातील मुख्य खनिजे, उपलब्धता आणि उत्पादन

एखाद्या विशिष्ट भागात, किंवा राज्यात देशातील उपलब्ध साधन संपत्तीला अव्दितीय स्थान प्राप्त होते. तेंव्हा ती देशाच्या आर्थिक विकासामधे महत्वाची भूमिका बजावते. विविध आणि मुबलक साधनसंपत्तीने भारत संपन्न आहे. त्यातील कच्चे लोखंड, सोने, मँगनीज, चुनखडी, तांबे, बॉक्साइट, क्रोमाइट, अभ्रक, ॲस्बेस्टॉस आणि ग्रॅनाइट ही महत्वाची खनिजे आहेत. त्याची आपण माहिती करुन घेउया. कर्नाटकाची सुवर्ण उत्पादनात मक्तेदारी असल्याने तिला 'सुवर्णभूमी' असे म्हटले जाते.



कच्चे लोखंड (Iron ore) : याचा वापर लोह आणि पोलाद उद्योगात कच्चा माल म्हणून केला जातो. कर्नाटकात मॅग्नेटाइट आणि हेमेटाइट प्रकारच्या अनेक लोह खाणी आहेत. ओरिसानंतर कच्च्या लोखंड उत्पादनात कर्नाटक दुसऱ्या स्थानावर आहे. राज्यात 75 लोखंडाच्या खाणी चालू स्थितीत आहेत. येथील लोखंड उत्तम प्रतीचे असून त्यामधे 63% मॅग्नेटाइट आणि इतर हेमेटाइट प्रकारचे आहे.

©KTBS Not to be republished

उपलब्धता : कच्च्या लोखंडाची उपलब्धता मुख्यत: बळ्ळारी, चिक्कमंगळूर, बागलकोट, चित्रदूर्ग, तुमकूर, शिमोगा, दक्षिण कॅनरा, उत्तर कॅनरा आणि गदग जिल्ह्यात आहे. बळ्ळारी जिल्ह्यात आमाप साठे असून ते होस्पेट आणि सोंडूर भागात आढळतात. दोनी मलाई, विभूतीगुड्ड, बेळगांव, कुमारस्वामी टेकड्या, तिम्मप्पानगुड्डी, देवाद्रि पर्वत रांगा, रामदूर्ग टेकड्या या ठिकाणी लोह उत्पादन केले जाते.

कृती

तुमच्या जिल्ह्यात आढळणाऱ्या खनिजांची सूची तक्रार करा

चिक्कमंगळूर जिल्ह्याचा यात दुसरा क्रमांक लागतो. बाबाबुडनगिरी पर्वत, केम्मनगुंडी, कुद्रेमुख, गंगामूल, कलहत्तगिरी आणि जेनसूरी टेकड्यामधे कच्चे लोखंड उपलब्ध आहे. कुद्रेमुख येथे राष्ट्रीय उद्यान आहे. त्यामध्ये जैववैविध्यांचे रक्षण करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने तेथील खाणखोदकाम बंद करण्याचा आदेश दिला आहे. चित्रदूर्ग जिल्ह्यातील होसदूर्ग, सासल, बागलकोटचे आमिनगड, तुमकूर जिल्ह्यातील चिक्कनायकनहळ्ळी, हूलियारु, शिमोगा जिल्ह्यातील कुमसी, शंकरगुड्ड आणि सिध्दरहळ्ळी इ. ठिकाणी कच्च्या लोखंडाचे साठे आढळतात.

राज्यातील कच्चे लोखंड, भद्रावती स्टील फॅक्टरी आणि बळ्ळारीजवळील जिंदाल, विजयनगर स्टील आणि पोलाद कारखाना येथे पाठविले जाते. शिल्लक कच्च्या लोखंडाची निर्यात केली जाते.

मँगनीज : हे खनिज मुख्यत: संमिश्र, गाळाच्या (थरांच्या) खडकाच्या स्वरुपात आढळते. याचा उपयोग लोखंडाला टणकपणा येण्यासाठी मिश्र धातू म्हणून केला जातो. याचा अन्य उपयोग रसायने, विद्युत प्रकल्प, रासायनिक खते, कॅलिको प्रिंटिग आणि रंग उद्योगात केला जातो म्हणून याला बहुद्देशीय खनिज म्हटले जाते.

विभागणी : कर्नाटकात मँगनीजच्या खाणी पुष्कळ असून देशाच्या एकूण उत्पादनाच्या 27% उत्पादन येथे आढळते. मँगनीजच्या उत्पादनात देखील ओरिसानंतर कर्नाटकाचा दुसरा क्रमांक लागतो.

ज्या ठिकाणी लोहसाठे आढळतात तेथेच मँगनीजचे साठे मिळतात. बळ्ळारी जिल्ह्यातील सोंडूर हे ठिकाण मँगनीज निर्मितीसाठी महत्वाचे आहे. राज्याच्या एकूण उत्पादनाच्या 90% उत्पादन येथे केले जाते. शिमोगा जिल्ह्यातील कुमसी, शंकरगुड्ड आणि होसहल्ली, तुमकूर जिल्ह्यातील चिक्कनायकनहळ्ळी, उ. कॅनरा जिल्ह्यातील शिर्सी तालुका, सुपा, लोंढा, उसकांड आणि धारवाड, विजापूर आणि चिक्कमंगळूर येथे इतर मुख्य खाणी आहेत. राज्यातील मँगनीजचा बराच मोठा भाग जपान, चीन आणि अन्य देशांना निर्यात केला जातो.

©KTBS Not to be republished

बॉक्साइट : याचा वापर ॲल्युमिनीयमच्या उत्पादनात केला जातो. सिमेंटचे उत्पादन, स्टील आणि विद्युत वायर यांच्या निर्मितीमधे बॉक्साइटचा वापर केला जात आहे. याची मागणी सतत वाढतच आहे.

विभागणी : कर्नाटकातील बेळगांव, चिक्कमंगळूर, चित्रदूर्ग, द. कॅनरा आणि उडपी या जिल्ह्यात बॉक्साइटच्या खाणी आढळून येतात. बेळगांव जिल्हा बॉक्साइट निर्मितीमधे अग्रेसर आहे. बेळगांव आणि खानापूर तालुक्यात बॉक्साइटच्या खाणी आहेत. येथील इंडियन ॲल्युमिनियम कंपनी (इंडाल- बेळगांव) या कारखान्यात या खनिजांचा वापर केला जात आहे. अलीकडे वाढत्या मागणीमुळे याच्या उत्पादनातही वाढ झाली आहे.

सोने : सोने हा दुर्मिळ, चकाकणारा आणि दीर्घ काळ टिकणारा पिवळा धातू आहे. याचा वापर दागिने आणि घड्याळांच्या निर्मितीमधे केला जातो. सोन्याचा वापर आणि मागणी सतत वाढतच असल्यामुळे त्याची किंमत गगनाला भिडली आहे.

भारतात सुवर्ण उत्पादनात कर्नाटकाचा पहिला क्रमांक आहे. देशाच्या एकूण उत्पादनाच्या 80% उत्पादन कर्नाटकात घेतले जाते. याचसाठी कर्नाटकाला सुवर्णभूमी म्हटले जाते. फार पूर्वीपासूनच येथे सोन्याचे उत्पादन होते. इ. स. 1880 मधे जॉन टेलर यांनी सोन्याच्या खाणीची सुरवात केली, याचमुळे कोलार गोल्ड फिल्ड ची 1885 मधे स्थापना झाली. इथे चार प्रमुख खाणी आहेत. त्या म्हणजे नंदीदूर्ग, उरीगांव, चँपीयन रीफ आणि म्हैसूर माईन्स होय. यामधील चँपीयन रीफ अत्यंत खोल (3217 मी) आहे. फार पूर्वीपासून सततच्या उपश्यामुळे सोन्याचा साठा संपण्याच्या मार्गावर आहे.

सध्या रायचूर जिल्ह्यातील हट्टी येथे सर्वात मोठी सोन्याची खाण आहे. येथे सोन्याचे मोठ्या प्रमाणात उत्पादन केले जात आहे. तुमकूर जिल्ह्यातील बेल्लारा आणि शिराजवळील अजनहळ्ळी येथेही सोन्याचे उत्पादन केले जाते. मुळगुंद, गदग जिल्ह्यातील कप्पटगुड्डा आणि हासन जिल्ह्यातील केंपिनकोटे ही सोन्याच्या साठ्याची इतर ठिकाणे आहेत.

स्वाध्याय

I. खालील रिकाम्या जागा योग्य शब्दांनी भरा.

1. कुद्रेमुख येथे ..... हे खनिज आढळते.
2. उत्तम दर्जाचे कच्चे लोखंड ..... येथे आढळते.
3. बळ्ळारी जिल्ह्यातील सोंडूर येथे ..... खाणी आढळतात.
4. ..... हा धातू बॉक्साइटपासून तयार होतो.
5. ..... ही सर्वात खोल सोन्याची खाण आहे.

©KTBS Not to be republished

पिंजण्याचे (Ginning)आणि कापड विणण्याचे उद्योग स्थापित झालेले आहेत. सध्या राज्यामध्ये 44 सुतीवस्त्रोद्योग आहेत. तेथे वार्षिक सरासरी.5.1 दशलक्ष मीटर सुती कापडाचे उत्पादन होते.

अलिकडच्या काही काळात काही सूतगिरण्या बंद पडल्या आहेत याला कारण म्हणजे कापसाची कमतरता, जुनाट यंत्रे, विद्युतशक्तीचा अभाव, वाढता उत्पादनखर्च, कृत्रिम धाग्यापासून बनविलेले कापड, उत्पादकातील स्पर्धा वगैरे होय.

कर्नाटकातील सुतीवस्त्रोद्योगांची परिस्थिती सुधारण्यासाठी सरकारने सुवर्ण वस्त्रोद्योग धोरण 2008-13 ही योजना प्रारंभ करून 11 जिल्ह्यांमध्ये तयार कपडयांचे पार्क (Finished Goods Parks) स्थापन केले आहे. या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश म्हणजे या उद्योगांमध्ये तयार झालेला पक्कामाल परदेशी निर्यात करणे हा होय. सुतीकापड निर्यातीमध्ये कर्नाटकाचा देशात दुसरा क्रमांक लागतो, अशाप्रकारचे पार्कस, दोड्डबळ्ळापूर,आनेकल, बेळगाव, म्हैसूर, रामनगर येथे आहेत.



साखरउद्योग

साखर उद्योग हा कर्नाटकातील मोठया प्रमाणातील प्रमुख उद्योगधंद्यांपैकी एक आहे. हा सुध्दा शेतीवर आधारित उद्योग आहे. याच्या प्रगतीसाठी आवश्यक असलेले स्थायीकरणाचे घटक राज्यामध्ये पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत. उदा. ऊसाचे उत्पादन , उत्तम हवामान, विद्युत पुरवठा, स्थानिक बाजारपेठ, वाहतूक व्यवस्था इ. हा उद्योग कर्नाटकच्या आर्थिक प्रगतीमध्ये महत्वाची भूमिका बजावतो. 19 व्या शतकाच्या पूर्वार्धात श्रीरंगपट्टणमधील पालळळी (अष्टग्राम) आणि चिक्कबळ्ळापूर

©KTBS Not to be republished

भारतातील दारिद्र्याची कारणे

भारतातील दारिद्र्याला ऐतिहासिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय घटक कारणीभूत आहेत. दारिद्र्याची आर्थिक कारणे खालील प्रमाणे आहेत.

1. **जलदगतीने वाढणारी लोकसंख्या–** वाढत्या लोकसंख्येमुळे विकासाचे कितीही उपक्रम राबविले तरी मूलभूत गरजा भागविणे अशक्य झाले आहे.
2. **कमी प्रमाणातील उत्पन्नाची पातळी व मंदगतीची उत्पन्न वाढ–** एकीकडे मागासलेपणा तर दुसरीकडे प्रचंड वेगाने वाढणारी लोकसंख्या यामुळे दरडोई उत्पन्नाची पातळी खालावली आहे. कमी उत्पन्न, कमी बचत, कमी भांडवल गुंतवणूक, कमी उत्पादन व मंदगतीने होणारी उत्पन्न वाढ या सर्व बाबींचे हे एक दुष्टचक्र आहे.
3. **किंमतीची वाढ–** सतत वाढणाऱ्या वस्तूंच्या किंमतीमुळे कमी उत्पन्न असणाऱ्या लोकांच्या खरेदी क्षमतेवर परिणाम झाला आहे. गरीब दिवसें दिवस आणखीनच गरीब होत आहेत.
4. **बेकारी–** विकासाच्या सर्व योजना गरजूंना नोकरी देण्यास असफल ठरल्या आहेत. त्यामुळे बेकारीत वाढ होऊन दारिद्र्य वाढलेले आहे.
5. **भांडवलाची कमतरता–** कमी उत्पन्न व कमी बचत यामुळे लागण्याऱ्या भांडवलाची कमतरता भासून गुंतवणुकीवर त्याचा परिणाम होत आहे. त्यामुळे उत्पादन कमी होऊन उत्पन्न क्षमताही कमी झाली आहे. परिणामतः गरिबीत वाढ झाली आहे.

भूक व अन्न सुरक्षा

दारिद्र्याची मुख्य लक्षणे म्हणजे भूक व दयनीय अवस्था. गरिबांना पौष्टीक आहार योग्य प्रमाणात मिळत नाही. बाहेरुन विकत आणण्यासाठी पुरेसे उत्पन्न त्यांच्याकडे नसते. यामुळे अन्नाची असुरक्षितता वाढते. काही गरीब लोक अर्धपोटी व उपाशी राहतात. 'आंतरराष्ट्रीय अन्न धोरण व संशोधन संस्था' (IFPRI) ही संस्था जगातील प्रत्येक देशातील भुकेचे प्रमाण मोजते आणि जागतिक भूक निर्देशांक (Globle Hunger Index) या त्यांच्या वार्षिक अंकाद्वारे प्रकाशित करते.

जागतिक भूक निर्देशांकाचे मापनः हा निर्देशांक खालील गोष्टींच्या आधारे मोजतात.

निकृष्ट आहार– एकूण लोकसंख्येमध्ये निकृष्ट दर्जाच्या आहाराने त्रस्त झालेल्या लोकांची संख्या

कमी वजनाची मुले – उंचीच्या प्रमाणात कमी वजन असणारी 5 वर्षाच्या आतील मुले

खुरटलेली मुले– वयाच्या मानाने उंचीची वाढ न झालेली 5 वर्षाच्या आतील मुले

बालमृत्यू दर– 5 वर्षाच्या आतील मुलांचा मृत्युदर

©KTBS Not to be republished

- या रकमेची यादी तयार केली जाते. याला ताळा असे म्हणतात. किंवा Trial Balance असेही म्हणतात.
- ताळा यादी तयार केल्यानंतर अंतिम हिशेब (जमाखर्च) तयार केला जातो.
- अंतिम हिशेबाचे (जमाखर्च) तीन भाग किंवा खाती असतात.

अ) व्यापार खाते (Trading Account)

ब) नफा आणि तोटा खाते (Profit and Loss Account)

(सामान्यत: हे दोन हिशेब (जमाखर्च) एकत्र लिहिण्याची पध्दत आहे.)

उदा ..... यांचे ..... कालावधीचे व्यापार, नफा आणि तोट्याचे खाते.

क) संपत्ती आणि जबाबदारी यादी (Balance sheet) : येथे व्यवसायातील सर्व संपत्ती आणि जबाबदाऱ्या यांची यादी तयार करावी लागते (संपत्ती आणि जबाबदारी यांच्या यादीला आढावा पत्रक असे म्हणतात.)

सर्व व्यवहाराची नोंद केलेल्या पत्रकाला खाते वर्तुळ (Accounting Cycle) असे म्हणतात.

खाते वर्तुळ



खात्यांचे वर्गीकरण : खात्यांचे वर्गीकरण तीन प्रकारचे केलेले असते.

1. वैयक्तिक खाते : व्यक्तिशी किंवा व्यवसायाशी केलेला व्यवहार जो लिहुन ठेवलेला असतो त्या खात्याला वैयक्तिक खाते असे म्हणतात. उदा : सुरेश याचे खाते, बँक खाते, राजन यांचे खाते.

©KTBS Not to be republished